**महाराष्ट्र शासन**

**कौशल्य विकास व उद्योजकता विभाग**

**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई -१**

---

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत दिनांक २२.११.२०१५ रोजी पदभरतीच्या अनुषंगाने लेखी परीक्षा आयोजीत करण्यात आली होती. त्यानंतर विविध टप्प्यात सदर पदभरतीबाबत प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार **शिल्प निदेशक पदे वगळून** इतर पदांच्या प्रोव्हिजल गुणवत्ता यादया व निकाल प्रसिध्द करण्यांत आलेल्या आहे.

पदभरतीच्या अनुषंगाने सर्व संबंधित उमेदवारांना कळविण्यांत येते की, संचालनालयाच्या स्तरावर सुरु असलेली सदर कार्यवाही ही पारदर्शकपणे करण्यांत येत आहे. निकाल तयार करणे, निवड यादया हया सर्व बाबी संगणकाव्दारे तयार करण्यांत येत आहेत. सदर पदभरतीबाबत आपण कोणत्याही प्रकारे कोणत्याही व्यक्त्ीच्या अमिषाला बळी पडू नये असे आवाहन करण्यांत येत आहे.

दि.१७/१२/२०१६ च्या नोटिफिकेशन मध्ये दिल्यानुसार दि.२ जानेवारी २०१७ रोजी उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी निकाल जाहिर केलेल्या यादीतील गुणानुक्रमे (मेरिटनुसार) व पदांच्या संख्येनुसार त्या त्या प्रवर्गाचे सामाजिक व समांतर आरक्षण यांच्या प्रमाणात उमेदवारांच्या कागदपत्रांची त्यांनी केलेल्या ऑनलाईन अर्जातील माहितीनुसार पडताळणी करण्यासाठी यादया तयार करण्यांत येत असून त्या त्या प्रादेशिक कार्यालयनिहाय यादया लवकरच वेबसाईटवर देखील प्रसिध्द करण्यांत येणार आहेत.

उमेदवारांचे संबंधित पदासाठी आवश्यक असलेले शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, विविध खेळातील प्राविण्य प्रमाणपत्र, व इतर अधिकचे आवश्यक प्रमाणपत्र, ही सर्व मुळ प्रमाणपत्रे (ओरिजनल सर्टिफिकेट ) यांची प्रत्यक्ष पडताळणी करण्यांत येणार आहे. त्यासोबतच सदर प्रमाणपत्राच्या प्रत्येकी २ छायांकित प्रती (ॲटेस्टेट/ सेल्फ अटेस्टेट ) सोबत असणे आवश्यक आहे.

वरील प्रमाणपत्रे पडताळणी करण्यासाठी त्या त्या प्रादेशिक कार्यालयातील उमेदवारांनी या संचालनालयाच्या अधिपत्याखालील संबंधित प्रादेशिक कार्यालयाच्या स्तरावर उपस्थित रहावयाचे आहे. उमेदवारांच्या पडताळणी करावयाच्या प्रादेशिक कार्यालयनिहाय यादया, विभागाचे नांव, संस्था/ कार्यालयाचे नांव व पत्ता याबाबींची माहिती वेबसाईटवर व आपण नोंदविलेल्या मोबाईल क्रमांकावर एसएमएस(SMS) व्दारे कळविण्यांत येईल. त्याप्रमाणे संबंधित उमेदवारांनी पडताळणी करुन घेण्याची त्यांची व्यक्तिश: जबाबदारी राहील याची सर्व संबंधित उमेदवरांनी नोद घ्यावी.

**सही/-**

**अध्यक्ष**

**गट क व ड पदभरती सनियंत्रण समिती,**

**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय व**

**कौशल्य विकास व उद्योजकता संचालनालय**